# ढवळे हॉस्पिटल रामकृष्ण बजाज नॅशनल क्वालिटी सन्मान पत्राचे मानकरी

आरोग्य क्षेत्रातील दर्जेदार कामाबद्दल डॉ.एम.एल.ढवळे मेमोरियल ट्रस्टचे ग्रामिण होमियोपॅथिक रूग्णालय इंडीयन मर्चंट्स चेंबरच्या रामकृष्ण बजाज नॅशनल क्वालिटी (RBNQ) पुरस्कार २०१८ अंतर्गत प्रशिस्ती पत्राचे मानकरी ठरले आहे. दिनांक १५ मार्च २०१९ रोजी मुंबई येथे झालेल्या समारंभात प्रसिद्ध वैद्यकीय तज्ञ डॉ.फारूख उदवाडीया यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आले. डॉ. प्रकाश गुडसूरकर, ह्यांनी ढवळे हॉस्पिटल च्या वतीने हा पुरस्कार स्वीकारला.

तसेच NABH (National Accreditation Board for Hospital Health Care Providers) तर्फे ढवळे हॉस्पिटलला होमिओपथी व ॲलोपथी ह्या दोन्ही वैद्यकीय सेवांसाठी मान्यता प्राप्त हॉस्पिटलचा दर्जा प्रदान करण्यात आला आहे. ढवळे हॉस्पिटल हे भारतातील एकमेव रूग्णालय आहे ज्यांना दोन्ही वैद्यकीय सेवांसाठी मान्यता प्राप्त सेवेचा सन्मान मिळाला आहे.

चांगल्या दर्जाची वैद्यकीय सेवा देण्याबद्दल मान्यता मिळाल्यानंतर ह्या सेवा गरीबांना परवडणाऱ्या दरात अथवा मोफत देण्यासाठी पालघर मध्ये आयुष्यमान भारत योजना व इ.एस.आय.सी.तर्फे कामगारांना व त्यांच्या कुटुंबियांना वैद्यकीय सेवा देण्यासाठी ढवळे हॉस्पिटल प्रयत्नशील आहे.

डायलिसीस, आय.सी.यु. व एन.आय.सी.यू, इ.एन.टी.(कान, नाक, घसा), अस्थिरोपण शस्त्रक्रिया, ज्येष्ठ नागरीक सेवा केंद्र इत्यादी विविध उपक्रमांद्वारे समाजाच्या विविध वैद्यकीय गरजा भागवणाऱ्या ट्रस्टच्या प्रयत्नांना पालघर भागातील कंपन्या व दानशूर व्यक्तींचा हातभार देणगी स्वरूपाने लाभला आहेच व असेच सहकार्य पुढे राहील असा ढवळे रूग्णालयाचा विश्वास आहे ज्यामुळे या सेवेचा लाभ अधिकाधिक गरजुंना घेता येईल असे रूग्णालयाचे संचालक डॉ.आनंद कापसे यांनी नमूद केले आहे.